महिलांचे हक्क, कायदे आणि हनन

प्रा. संगीता वळसे
गृहअर्थशास्त्र विभाग, संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा
skwwalse@gmail.com, 9689271947

सारांश (Abstract)

भारतातील संविधानाने स्त्रिला फक्त समान हक्क व संधीच प्राप्त करुन दिल्या नाहीत तर स्त्री विकासासाठी खास मानवी हक्कांतर्गत स्त्रीहक्क देण्याची तरतुदहि केली आहे. प्रदान केलेले हक्क बजावून शांतता प्रस्थापित करण्याच्या महत्वाच्या कार्यात ती आपली लक्षणीय भूमिका पार पाडुन योगदान करू शकते.

प्रस्तुत शोधनिबंधात प्राचीन सुवर्णकाळातील स्त्रीवर दृष्टिक्षेप टाकून, मानवी हक्क, स्त्रियांना दिलेल्या हक्कातील भेद, स्त्रीहक्काच्या संरक्षणासाठी होत असलेले प्रयत्न, हक्काच्या अनुषंगाने स्त्रीची भूमिका व योगदान, या कार्यात येणा-या अडचणी व त्यावर उपाय.

महिलांच्या हक्काच्या निगडीत व आवश्यक अशा बाबींवर या संशोधनलेखाव्दारे प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्राचीन सुवर्णकाळातील स्त्री जीवनापासून पासून घेतलेला एक आढावा :

प्राचीन भारतीय इतिहासाने स्त्रिला पवित्र ईश्वरी दर्जा प्रदान केला आहे. लक्ष्मी, दुर्गा, आणि सरस्वती हया तीन अनुक्रमे समृध्दी, शक्ती किंवा सामर्थ्य आणि बुध्दीमत्तेच्या प्रतिकात्मक देवता मानल्या गेल्या. ज्या ठिकाणी स्त्रिची पूजा होते त्याठिकाणी परमेश्वर वास करतो असा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथात सापडतो.

'यत्र नार्यस्तु पूज्यते, रमंते तत्र देवता ' शास्त्रामध्ये स्त्रीच्या महतीचे वर्णन करतांना म्हटले आहे की स्त्री ही विद्या, श्रध्दा, पवित्रता, कला, कामधेनू, अन्नपुर्णा सर्वकाही असून सर्वश्रेष्ठ मानल्या गेली आहे.

वैदिक साहित्याच्या अभ्यासावरुन असे दिसुन येते की, पितृसत्ताक परिवारिक व्यवस्थेमुळे जरी पुत्रजन्माला विशेष महत्व दिल्या जात होते तरी मुलीना मुलाप्रमाणे सर्व सुविधा प्राप्त करुन दिल्या जात असतं.

वेदात स्त्री शिक्षण, शील, गुण, कर्तव्य तथा अधिकाराचे बाबतीत विस्तृत वर्णन केलेले दिसुन येते. वैदिक साहित्याचे अवलोकनानंतर असे दिसुन येते की, आपल्या देशात स्त्रियांना मोठे गौरवपूर्ण स्थान देण्यात येत होते. स्त्रियांच्या शिक्षण आणि दिक्षासाठी उत्तम व्यवस्था होती. आणि स्त्रिया राजनितिक, सामाजिक तथा प्रशासनात्मक कार्यात अतिशय महत्वपुर्ण भूमिका पार पाडत असतं. वेदात म्हटले आहे की 'गृहिणीचं ' घर आहे. सुशील पत्नी गृहलक्ष्मी आहे, स्त्रीला सावित्री नव्हे तर 'श्री ' संबोधिल्या गेले आहे. त्याचप्रमाणे मनुस्मृतीमध्ये म्हटले आहे की कुटूंबाच्या कल्याणासाठी स्त्रियांचा सन्मान अनिवार्य आहे. प्राचीन काळी

Permission to make digital or hard copies of all or part of this work for personal or classroom use is granted without fee provided that copies are not made or distributed for profit or commercial advantage and that copies bear this notice and the full citation on the first page. To copy otherwise, or republish, to post on servers or to redistribute to lists, requires prior specific permission and/or a fee.

© Copyright 2015 Research Publications, Chikhli, India

भारतात प्रामुख्याने वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचे पुरुषाप्रमाणेच अधिकार प्राप्त होते.

कौटिल्याच्या अर्थशास्त्र व मानवधर्मशास्त्रात सामाजिक व्यवस्थेचे विस्तृत विवरण करण्यात आले आहे. हयांत मात्र स्त्रियाविषयीचे धोरण बदललेले आढळुन येते. स्त्रियांना विवाहव्यतिरिक्त कुठल्याही धार्मिक संस्कारात वेदमंत्र उच्चार वर्जित करण्यात आला होता. याच काळात सदैव पुरुषांच्या आधीन राहण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली.

मध्यकाळात मोगल साम्राज्याची स्थापना झाल्यावर स्त्रियांच्या पडदा प्रथेवर आणखी भर देण्यात आला, मुर्लींच्या विवाहाचे वय कमी करण्यात आले. विधवा विवाह पूर्णपणे बंद झाले, सतीप्रथेला उत आला. स्त्रियांना जन्मापासुन मृत्यृपर्यत पुरुषाचे आधीन करुन त्यांचे समस्त अधिकार व स्वातंत्रता काढुन घेण्यात आली. मात्र कुटूंब, समाज, राष्ट्र, तथा प्रशासनाच्या योग्य कार्यासाठी महिलांना शिक्षित करणे अत्यावश्यक असण्यावर भर स्वामी दयानंद, महात्मा गांधीजी, पंडीत जवाहरलाल नेहरु, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले इ. व्यक्तिनी दिला.

स्वांतत्र्य प्राप्तीनंतर देशात प्रामुख्याने स्त्रीशिक्षणावर विशेष जोर देण्यात येवून या विषयावर गांभीर्यपूर्वक विचार करण्यासाठी अनेक समित्या तथा आयोग नेमण्यात आले. शिफारशी कार्यान्वित करण्यासाठी निरनिराळया योजना आखण्यात आल्या.

जगातील स्त्रियांनी गेले कित्येक दशकापासुन स्वास्थ, शिक्षण इ. अनेक कार्यक्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. १९५० पासुन स्त्रियांची आयुमर्यादा ४९ वर्षाहुन ६८ वर्षावर गेली आहे. १९६० पासून मजूर क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग ३३ टक्क्यावरुन ५४ टक्क्यावर पोहचला. १९७० पासून स्त्रियांच्या साक्षरतेमध्ये ५४ टक्क्यावरुन ६४ टक्क्यापर्यत वाढ झाली आहे. आणि १९८० पासून मुले आणि मुलींच्या माध्यमिक शाळेतील नोंदणीतील तफावत ८० मुलीवरुन ९० मुलीपर्यत वाढ झालेली आहे.

समाजातिल स्त्रियांचे संपूर्ण सहभागीत्व आणि सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी स्त्रियांचा विकास याबद्दलच्या वाढत्या जागरुकतेपोटी ही प्रगती दिसुन येते.

गृहितकृत्य:

महिलांना घटनेने जरी हक्क प्रदान केलेले असले तरी सामाजिक, आर्थिक, राजकिय क्षेत्रात महिलांच्या हक्काचे मोठे हनन होत आहे.

संशोधन पध्दती: या संशोधनात व्दितीय श्रोत ज्यामध्ये पीएच.डी संशोधन ग्रंथ, पुस्तके, संशोधन मासिका मध्ये प्रकाशित संशोधनपर लेख, रिपोर्टस् इ. चा वापर करण्यात आला.

स्त्रियांना दिलेल्या हक्का मधील फरक :-

उपरोक्त प्रगती दिसुन येत असली तरी लोकसंख्या सुची कार्यालयाने दाखवून दिले की, अद्यापही सर्व जगातील स्त्री वर्ग आर्थिक आणि सामाजिक फायदे मिळवुन घेण्याचे बाबतीत पुरुषांच्या तुलनेत मागेच आहे. काही महत्वाच्या क्षेत्रातील तफावाबद्दल विश्लेषणात्मक माहिती खाली दिलेली आहे.

भारतीय संविधान कुठल्याही बाबतीत लिंगभेद असता कामा नये असे आवार्जून सांगत असले तरी भारतात लिंगभेद होत असल्याचे दृष्टीत्पत्तीस येते. पंचवार्षिक योजनेमध्ये स्त्री कल्याणापासुन स्त्री सबळीकरणापर्यत अनेक योजना आखून कार्यान्वीत करण्यात आल्या. स्त्री साक्षरतेसाठी अनेक आयोग तथा समित्या गठीत करण्यात आल्या. त्यांच्याकडुन शिफारशी मागविण्यात आल्या तथापी त्या कागदोपत्रीच राहील्या.

आज भारतात शिक्षणाच्या क्षेत्रात लिंगभेद प्रकर्षाने जाणवतो. आकडेवारीवरुन भारतात साक्षरतेचे प्रमाण वाढले असल्याचे दिसुन येते. मात्र पुरुष आणि स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणाकडे तुलनात्मक दृष्टीने पाहिल्यास गेल्या चार शतकातील अंतरात विशेष फरक झाला नसल्याचे खालील आकडेवारीवरुन दिसून येते.

वर्ष	**पुरुषसाक्षरता**	**स्त्रीसाक्षरता**	**फरक/ अंतर**
१९६१	४१.५०	१३.१५	२८.३५
१९७१	४७.६९	१९.३६	२८.३३
१९८१	५४.९१	२५.७०	२९.२१
१९९१	६१.८९	३४.०९	२७.८०
१९९७	६६.७८	३९.४०	२७.३८

आधार :- जनगणना पुस्तिका १९६१, १९७१, १९८१, १९९१ आणि मानव विकास अहवाल संयुक्त राष्ट्र.

(अ) शिक्षणातील तफावत :

अनेक देशात स्त्री आणि पुरुषाच्या शिक्षणातील तफावत कमी होत चालली असली तरी स्त्रियांच्या तुलनेत पुरुषच जास्त साक्षर असल्याचे दिसुन येते, (पुरुषाच्या ८०% साक्षरतेच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण ६४%) प्रामुख्याने ज्या विभागात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे अशा विकसनशिल देशात हा फरक जास्त दिसून येतो. अविकसीत भागात तर मुली शाळेत जाण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसते. हि तफावत माध्यमिक शाळेत प्राथमिक शाळेच्या तुलनेत जास्त दिसून येते. (मुलांच्या ५६% च्या तुलनेत मुली शाळेत जाण्याचे प्रमाण ४७%) याची अनेक कारणे आहेत. जसे :- पालकांची आर्थिक स्थिती, कमी वयातील विवाह, घरगती कामाची जबाबदारी, घरी भावंडाची जबाबदारी, बाहेरील असुरक्षीतता आणि स्त्रियांसाठी ज्या ठिकाणी उच्चशिक्षणाची आवश्यकता आहे अशा ठिकाणी नोकरीसाठी उपलब्ध असलेल्या कमी संधी इ. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणात ग्रामिण आणि शहरी भागात सुध्दा तफावत दिसून येते.

वर्ष	पुरुष	स्त्रिया
१९८१ (All Area)		
ग्रामिण	४९.६	२१.७
शहरी	७६.७	५६.३
१९९१ (All Area)		
ग्रामिण	५७.००	३०.६
शहरी	८३.३०	६५.७

आधार : Statistical data base for Litreacy NIAE

(ब) कार्यविषमता / तफावत :

जगातील सर्वच स्त्रियांना दोन्हीही त-हेच्य जबाबदारीला तोंड देत पुरुषापेक्षा जास्त कामाचा बोजा उचलावा लागतो. घरातील स्वयंपाक, स्वच्छता, मुलांचे संगोपन आणि याव्यतिरिक्त घराबाहेरील कामे इ. करावे लागतात. जगभरातील औपचारिक मजूर वर्गात पुरुषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण तुलनात्मक दृष्टया तसे कमीच आहे. (८२% पुरुष तर ५४% स्त्रिया) मात्र शेतीकाम व नोकरीत स्त्रिया जास्त गुंतलेल्या दिसून येतात. स्त्रियाना बिगरशेती कामासाठी पुरुषापेक्षा कमी मजूरी दिल्या जाते.

रोजगार मंत्रालयंतर्गत महानिर्देशक, रोजगार व प्रशिक्षण यांनी केलेल्या अवलोकनावरुन संघटीत क्षेत्रात स्तियांना उपलब्ध असलेल्या रोजगाराचे प्रमाण केवळ १६.३ टक्के असल्याचे दिसून येते.

(क) कौटूंबिक मनस्वास्थ्याचा अभाव :

१९७९ पासून १९९५ पर्यंत झालेल्या निरनिराळया स्त्रियांवरील मानवी हक्काच्या कुचंबणेच्या उच्चटनासंबंधीच्या कार्यशाळेत स्त्रियावरील घरगुती छळ कमी करण्याचे प्रयत्न झाले. अमेरीकेतील मानवी हक्क आयोगानुसार स्त्रियांच्या विरोधात होत असलेले

घरगुती छळाचे प्रकार हे प्रामुख्याने पुरुषाकडुनच घडल्या जातात. घरगुती छळामुळे स्त्रियांच्या शारिरिक, आर्थिक, आणि सामाजिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. ब-याच स्त्रिया केवळ कुटूंबाबाहेरील होणा-या बदनामीमुळे हा छळ सहन करतात. हे सर्व केवळ पुरुषावर आर्थिक दृष्टया विसंबून राहावे लागत असल्यामुळे स्त्रिया मान्य करतात.

(ड) स्त्रियांचे आरोग्य - आव्हान :

लोकसंख्या नियंत्रणासाठी उपलब्ध असलेल्या प्रभावी उपायातील कुटुंबनियोजनासाठी वापरण्यात येणा-या पध्दती प्रामुख्याने स्त्री वर लादल्या जातात. या पध्दतीबद्दलचे पूर्ण ज्ञान स्त्रियांना असत नाही. त्यासाठी किंवा इतर आरोग्य विषयक सवलती मिळवून घेण्यास त्या असमर्थ ठरतात. अंदाजे जवळजवळ ६,००,००० स्त्रिया दरवर्षी गर्भधारणा, अपत्यांना जन्म तथा गर्भपात इ. कारणामुळे दगावल्या जातात. हे केवळ स्त्रियांना त्यांना मिळणा-या स्वास्थ्याबद्दलच्या हक्कापासून त्या वंचीत राहील्यामुळेचा गर्भधारणा व पर्यायाने अपत्यांना जन्म देण्यासाठी त्यांच्यावर होणा-या अत्याच्याराचे प्रमाण कमी झाल्यास त्यांचया दगावण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

स्त्री हक्कासाठी होत असलेल्या प्रयत्नांचा आढावा :

जगातील सर्व देशात स्त्रियांचे हक्क अबाधित राखण्यासाठी निरनिराळया प्रकाराने प्रयत्न होत आहे. त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या प्रणालीमागील प्रमुख उद्देश म्हणजे त्या प्रयत्नाने राष्ट्रसंघाच्या कार्यात विलीनीकरण करणे व त्या हक्कांच्या हानी संबंधीत समस्या हाताळण्यासाठी खास कार्यप्रणाली निर्माण करणे हे होत.

स्त्रियांचे हक्क अबाधित राखण्यासाठी अमेरीकेने अनेक परिषदांचे आयोजन केले (मेक्सिको १९७५, डेन्मार्क १९८०, केनिया १९८५) १९८५ साली झालेल्या जागतिक परिषदेने स्त्रियांच्या अधिकारातील तफावत दूर करुन त्यांना सर्व क्षेत्रात समान हक्क मिळवुन देण्यासाठी कार्यप्रणालीचा पुरस्कार केला.

१९९३ मधील जाहीरनामा आणि कार्यक्रमानुसार अमेरीकेच्या मानविहक्क पध्दतीत स्त्रीहक्काचे विलीनीकरणासाठी शिफारस करण्यात आली.

१९९४ मध्ये स्थापण्यात आलेल्या मानवीहक्क आयोगाचे वतीने स्त्रियांच्या हक्काची हानी होण्यासाठी असलेल्या कारणांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

१९९५ मधील चीनमध्ये स्त्रियांवर झालेल्या चौथ्या जागतिक परिषदेत विकास प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग, समाजातिल त्यांचा दर्जा उंचावणे आणि शिक्षणासाठी अनेक संधी उंचावणे आणि शिक्षणासाठी अनेक संधी प्राप्त करुन देणे इ. बाबींना महत्व देण्यासाठी शिक्कामोर्तब करण्यात आले.

जगातील सर्व देशात स्त्रियांचे हक्क जपण्याचे महत्व अनन्यसाधारणच म्हणावे लागेल. एका ऐतिहासिक निर्णयाव्दारे राजस्थान शासनाचेवतीने सेवा नियम बदलण्यात येत असुन स्त्रियांची छळवणुक करणा-या कर्मचारी/ अधिकारी यांना शिक्षा करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

निरनिराळे अर्ज, प्रामुख्याने शाळेत प्रवेशासाठी भरण्यात येणा-या अर्जावर पाल्यांच्या वडिलांच्या नांवाबरोबर आईच्या नावाचा उल्लेख करण्यासाठी काही राज्यात सक्ती करण्यात येत आहे.

बिजींग येथील १९९५ च्या चवथ्या जागतिक ‘ मानवी हक्क ’ परिषदेच्या निष्कर्षानुसार पुरुषापेक्षा स्त्रियांच्या हक्कांचे उल्लंघन व लिंगभेदभाव करण्याचे

प्रकार जास्त होत आहेत. हे ख-या अर्थानी समजून घेवून त्यांचे महत्व जाणून घेणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय परिषद प्रामुख्याने १९९४ मधील कैरो या ठिकाणी झालेली ' लोकसंख्या आणि विकास ' तसेच अमेरीकन आंतरराष्ट्रीय परिषद - बेनजिन येथील चवथ्या जागतिक परिषदेमुळे स्त्रियांच्या प्रगती आणि समानाधिकरणासाठी प्रचंड चालना मिळाली.

जागतिक लोकसंख्या अहवाल २००० यांनी प्रथमच असे निदर्शनास आणून दिले की शिक्षण, स्वास्थ्याबद्दलच्या स्त्रियांच्या गरजा पूर्ण करुन लिंगभेद नाहिसा केल्यास लोकसंख्या संतुलीत राखून आर्थिक विकास साधणे सहज शक्य होईल. अशाप्रकारे लिंगभेद तफावत नाहीशी करणे ही मानवीहक्क व विकासासाठी प्राधान्याची बाब आहे.

अमेरीकन सुरक्षा परिषदेने ऑक्टोंबर २००० मध्ये एकमताने मान्य केलेल्या ठरावानुसार शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांची महत्वाची भूमिका असल्याचे जाहीर केले. स्त्रियांचा समान दर्जा व त्यांच्या हक्काबद्दलचा विषय हा नेहमीच वादातील राहीला आहे. स्त्रियांच्या हक्काचा प्रत्येक मनुष्यावर वैयक्तिक व प्रत्यक्षरित्या परिणाम होतो. मानवी हक्क कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने जागतिक स्तरावर लिंगबाबीला महत्व प्राप्त झाले आहे.

राष्ट्रपती के.आर. नारायणन् यांनी दिल्ली येथे झालेल्या ' मुक्त मुल्ये परिषदेत ' (१९९६) प्रतिपादन केले की, मानवी विकासाच्या सुशिक्षितावस्थेत आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, नागरी आणि राजकीय बाबी "मानवी अधिकार निर्माण करण्यासाठी एकत्रित झाल्या ".

कोणताही व्यक्ति मग तो पुरुष असो वा स्त्री, तिला शिक्षण घेण्याचा पूर्णतया हक्क संविधानाने प्रदान केला आहे असे असतांनाही स्त्रियावर शिक्षण घेण्याची बंदी घातली गेली होती म्हणजेच तिच्या मानवी हक्कावर गदा आणली होती. त्यावेळी सावित्रीबाई फुले, ताराबाई मोडक यांनी मानवी हक्काकरीता अथक परिश्रम घेतले.

शिफारशी :

विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रगतीच्या ओघात जीवनाच्या विविध क्षेत्रात स्त्रीने लक्षणीय प्रगती केली असली तरी तिला लाभलेल्या हक्काच्या आधारावर तिची भूमिका जास्त यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी खालील शिफरशी विचारात घेणे आवश्यक आहे.

१) समाजातील सर्वच स्त्री पुरुषांना महिलांचे हक्क संकल्पना अर्थ आणि महत्व समजावून देण्यासाठी उद्बोधक वर्ग उजळणीवर्ग, चर्चासत्रे, प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा तथा गटचर्चाचे विविध पातळीवर आयोजन करणे तसेच विद्यालयीन तथा महाविद्यालयीन पातळीवर निबंध स्पर्धाचे तथा वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन विषयाच्या स्पष्टीकरणासाठी अत्यावश्यक वाटते. प्रामुख्याने निरिक्षर महिलांसाठी या विषयावरील माहितीपट जास्त उपयुक्त ठरेल.

२) प्राथमिक माध्यमिक व उच्चमाध्यमिक तथा महाविद्यालयीन अभ्यासक्रमांत संविधानात नमुद केलेल्या मानवी हक्कांतर्गत ' स्त्री ' हक्काविषयीची विस्तृत माहिती देण्याची तरतुद करण्याचा शासन आणि संबंधीत शिक्षणतंज्ञांनी आग्रह धरावा.

३) शासन शासकिय तथा निमशासकिय संस्था समाजातील शिक्षणतज्ञ मान्यताप्राप्त व्यक्ती या सर्वांनी आपआपल्या परीने उपरनिदिष्ट अडथळे दुर करण्यास सहाय्य करावायास हवे.

४) स्त्रियांना लाभलेल्या निसर्गदत्त ' सहनशील व सोशीक ' स्वभावामुळे शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यात पुरुषापेक्षा जास्त प्रभाविपणे ती आपली

भूमिका पार पाडु शकते मात्र समाजाचे पाठबळ प्रोत्साहन तिला मिळणे अत्यावश्यक आहे.

संदर्भसूचीः

१. हयुमन राईट समाचार, भाग ७, अंक १ जवनरी २००० राष्ट्रीय मानव अधिकार आयोग नई दिल्ली – ११०००१, २०००

२. सेठी हरीशकुमार, 'महिलाओंकी समानता का प्रश्न', चेतना समाजकल्याण / एप्रिल, १९९७

३. श्रीवास्तव रमेशचंद, 'महिलाओकी स्थिती और विकास' (भागीदारी) समाजकल्याण / जुलाई, २००१

४. तिपाठी रामसूरत, 'भारत की साक्षरता मे लिंगभेद की प्रखरता' (आमुख कथा), समाजकल्याण / मार्च, २००१

5. ABC of Human rights, Page No. 22 and 44, Indian Institute of Human Rights Green gate

6. New Delhi 110030

7. Human Rights Newsletter, Vol. 8 No. 5 (April), National Human Rights Commission New Delhi

8. Human Rights Newsletter, Vol. 8 No. 5 (May) National Human Rights Commission New Delhi

9. Panjwani Raj, Rights and duties, Seminar – 492, 2000

10. Pathak D.N., Peace Education A Critical Dimension of Community Education Paper Presented at IV th National Conference on Community Education On 6-7 Dec. at Ujjain

11. Rashtra Mahila, Vol. 3 No. 19 (May) National Commission for Women New Delhi., 2001

12. Singh, Nisha, Technology Education and The Indian Women,University News 39 Association of Indian Universities New Delhi, 2001

१३. साखरे सीमा, न्याय हवा स्तीला, सीमा प्रकाशन नागपूर, २००८

१४. सरोदे असीम, कौंटुंबीक हिंसाचार आणि कायदा, मनोविकास प्रकाशन पुणे, २००९

१५. साखरे सीमा, भरारी, सीमा प्रकाशन नागपूर, १९९५